सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी “कर्तव्य” कालावधी म्हणून नियमित करणेबाबत.
श्रीम. स्मिता खरात, उपसंचालक.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश:- ई-१७८९४४७/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, तिसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:-०४.०९.२०२६.

संदर्भ:-

१. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे आदेश क्र. कार्यासन-३/प्रशासन/कार्यमुक्तता/२०२५/३३७४, दिनांक ०४.११.२०२५.
२. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र. संलेको/रोख/कार्या-१/श्रीम.स्मिता रतन खरात/प्रतिक्षाधीन/११-२०२५/६९७, दिनांक १०.११.२०२५.
३. स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांचे आदेश क्र.स्था-१८/ब/श्रीम. स्मिता खरात/उपसंचालक/आस्था-२/३२८, दिनांक १४.११.२०२५.
४. वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२५/प्र.क्र.१५५/कोषा.प्रशा-२, दिनांक ०४.०२.२०२६.
५. स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांचे आदेश क्र.स्था-१८/ब/श्रीम.स्मिता खरात/उपसंचालक/आस्था-२/४९, दिनांक ०९.०२.२०२६.
६. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/श्रीम.स्मिरखरात/प्रतिक्षाधीन/०२-२०२६/८६, दिनांक १४.०२.२०२६.
७. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१.
८. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१०.०८/प्र.क्र.२४/कोषा.(प्र.२), दिनांक २०.०२.२००८.
९. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७/सेवा-६, दिनांक ०३.०३.२०१६.
१०. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेवको / प्रशा-राप / का.६ /श्रीम. खरात/६.२६/८४१, दिनांक २९.०६.२०२६.

शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, उप संचालक संवर्गातील श्रीम. स्मिता खरात ह्या “अर्थ सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई” या पदावर कार्यरत असताना महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे दिनांक ०४.११.२०२५ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये श्रीम. खरात यांना प्रशासकीय कारणास्तव दिनांक ०४.११.२०२५ (म.नं.) रोजीपासून कार्यमुक्त करण्यात आले.

२) संचालनालयाच्या संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक १०.११.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्रीम.खरात यांना दिनांक ०६.११.२०२५ (म.पू.) रोजी संचालनालयात प्रतिक्षाधीन अधिकारी म्हणून हजर करुन घेऊन त्यांची सेवा संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई कार्यालयास वर्ग करण्यात आली.

३) श्रीम. खरात यांनी दिनांक ११.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने त्यांना दिनांक ११.११.२०२५ (म.पू.) पासून संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई कार्यालयात रुजू करुन घेण्यात आले. श्रीम. खरात यांना संचालनालयातील (पंरास) या शाखेतील कामकाज सोपविण्यात आले.

४) संदर्भाधिन क्र.४ येथील वित्त विभाग, शासन आदेश दिनांक ०४.०२.२०२६ अन्वये श्रीम.खरात यांना उप संचालक, वस्तु व सेवाकर आयुक्त कार्यालय, मुंबई या पदावर नियमित पदस्थापना देण्यात आली. सदर पदावर हजर होण्याकरीता संदर्भाधिन क्र. ६ येथील आदेशान्वये श्रीम. खरात यांना दिनांक ०४.०२.२०२६ (म.नं.) रोजीपासून संचालनालयातून कार्यमुक्त करण्यात आले. श्रीम. खरात ह्या उप संचालक, वस्तु व सेवाकर आयुक्त कार्यालय, मुंबई या पदस्थापनेच्या पदावर दिनांक ०५.०२.२०२६ (म.पू.) पासून रुजू झाल्या आहेत.

५) श्रीम. खरात यांना दिनांक ०५.११.२०२५ ते दिनांक ०४.०२.२०२६ पर्यंत एकूण ९२ दिवस म्हणजेच नियमित पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. सदर कालावधी “कर्तव्य कालावधी” म्हणून नियमित करणे आवश्यक आहे. नियमित करावयाच्या कालावधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

कालावधी	**दिवस**	**शेरा**
दिनांक ०५.११.२०२५	०१	शासकीय सुट्टी
दि.०६.११.२०२५ ते दि.१०.११.२०२५	०५	पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई कार्यालयात कार्यरत
दि.११.११.२०२५ ते दि.०४.०२.२०२६	८६	पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयात कार्यरत
एकूण	**९२**	

६) यास्तव, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) व (जी) तसेच, शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७/सेवा-६, दिनांक ०३.०३.२०१६ मधील

तरतूदींच्या अधीन राहून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उप संचालक संवर्गातील श्रीम. स्मिता खरात यांचा दिनांक ०५.११.२०२५ ते दिनांक ०४.०२.२०२६ रोजीपर्यंतच्या एकूण ९२ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर प्रतिक्षाधिन कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता आस्थापना अधिकारी, विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AVINASH ARUN BHASARKAR

Digitally signed by AVINASH ARUN BHASARKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Finance Department, 2.5.4.20=E962F15DD2B081A9AA0CDF32285776609615677882E0A28435A5BE27E2D6C7CF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8707B0CBBDA9E7EFC71FEF791C52991F5D18EFDC7877F8A5A64B6B6B745DD89A, cn=AVINASH ARUN BHASARKAR
Date: 2026.09.04 10:39:26 +05'30'

(अ. अ. भसारकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) सहसचिव, मा. मुख्यमंत्री तथा मा. मंत्री (वित्त) महोदयांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,*
४) संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५) संचालक, संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई,*
६) आस्थापना अधिकारी, विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, वस्तु व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई *
७) श्रीम. स्मिता खरात, उप संचालक *
८) निवड नस्ती, कोषा प्रशा-२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)